# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कोल्हापूर जिल्हयातील चंदगड आणि आजरा तालुक्यात वन्य प्राण्यांनी शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याबाबत

**(१) ८७५८ (०७-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री. भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील चंदगड आणि आजरा तालुक्यात वन्य प्राण्यांनी शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद् नुसार नुकसाग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१), (२) व (३) माहे डिसेंबर, २०१४ मध्ये कोल्हापूर जिल्हयातील चंदगड व आजरा तालुक्यात वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्याची २२८ प्रकरणे निदर्शनास आली असून सदर प्रकरणात संबंधितास नुकसानग्रस्त शेतकऱ्यास भरपाईपोटी रु. ४,६९,५३९/- नुकसानभरपाई अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आजरा तालुक्यातील (जि.कोल्हापूर) उचंगी प्रकल्पाचे कामअद्याप पूर्ण झाले नसल्याबाबत

**(२) ८७५९ (०७-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजरा तालुक्यातील (जि.कोल्हापूर) येथील उचंगी प्रकल्पाचे काम २००० सालापासून सुरू करून अद्याप काम पूर्ण झाले नाही हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करून पाणी साठा करणेबाबत मा.जलसंपदा मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. ३० जानेवारी २०१५ रोजी लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर प्रकल्पाचे काम पूर्ण करून पाणी साठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :** (१) होय.
(२) होय. दि. १५ जानेवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे.
(३) पुनर्वसनाचे काम अपूर्ण असल्याकारणाने प्रकल्पाचे काम होऊ शकले नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे चंदगड (जि.कोल्हापूर) येथे ताम्रपर्णी नदीवर कोल्हापूरी पध्दतीच्या बंधारयाबाबत**

**(३) ८७६० (०७-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री. भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चंदगड (जि.कोल्हापूर) येथे ताम्रपर्णी नदीवर कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा असून त्याची रुंदी कमी असताना जड वाहने सदर पुलावरुन जात असल्याने अपघात होत असतानाही त्या पुलावरुन आज देखील जड वाहने जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुल जड वाहनासाठी, वाहतुकीसाठी बंद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर बंधारा हा खाजगी वाहतूकीसाठी नाही, अशा सूचना या ठिकाणी लावणेची कार्यवाही केली आहे. सद्य:स्थितीत जड वाहनांच्या वाहतुकीस विरोध करण्यासाठी लोखंडी सांगाडा लावण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आजारा तालुक्यातील (जि.कोल्हापूर) चित्री धरणाची उंची वाढविण्याबाबत**

**(४) ८७६२ (०८-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री. भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आजारा तालुक्यातील (जि.कोल्हापूर) चित्री धरणाची उंची वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) नाही.

(२) कृष्णा पाणी ताआ लवादानुसार राज्यास घटप्रभा उपखोऱ्यात उपलब्ध झालेल्या पाण्याचे नियोजन पुर्ण झाले असल्याने चित्री धरणमध्ये वाढीव पाणीसाठा करण्यासाठी उंची वाढ करणे शक्य नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील शेतक-यांनी कृषि पंपासाठी लागणारी अनामत रक्कम भरुन वीज जोडण्या देण्यात आल्या नसल्याबाबत**

**(५) ८७६४ (०४-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री. भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज उपविभागतील गडहिंग्लज, आजरा व चंदगड तालुक्यातील सुमारे एक हजारावर शेतक-यांनी कृषि पंपासाठी लागणारी अनामत रक्कम भरुन एक वर्षाचा काळ ओलांडून गेला तरी वीज जोडण्या देण्यात आल्या नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर शेतक-यांच्या कृषि पंपाना तातडीने विद्युत पुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यस, विलंबाची सर्वसाधरण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) होय.

(२) प्रलंबित असणाऱ्या ग्राहकांसाठी पायाभूत सुविधा म्हणजे रोहित्रे, उच्चदाब वाहिनी, लघुदाब वाहिनी इ. उभे करावे लागणार आहेत. वरील कामे पायाभूत आराखडा योजना-२ मध्ये समाविष्ट असून सदरची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) शेती पंपाच्या नवीन वीज जेडणीसाठी पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या शेतकऱ्यांसाठी जादा विजेचे खांब. नवीन ट्रान्सफॉर्मर, उच्चदाब व लघुदाब वाहिनी इत्यादी कामे महावितरणच्या इन्फ्रा-२ या योजनेतून करण्यात येत आहे. जेष्ठता यादी नुसार शेती पंपाना वीजपुरवठा करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे होसूर (ता.चंदगड,जि.कोल्हापूर) गावाला स्वच्छ, शुध्द व पुरेसा पाणी पुरवठा होणेबाबत**

**(६) ८७६६ (०७-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री. भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे होसूर (ता.चंदगड,जि.कोल्हापूर) या गावाची पाणीपुरवठा योजना जुनी झाल्याने पाणीपुरवठा योजनेच्या जलवाहिन्यांना मोठया प्रमाणात गळती लागल्याने गावकऱ्यांना पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर गावाला स्वच्छ, शुध्द व पुरेसा पाणी पुरवठा होणेबाबत तसेच जलवाहिन्यांच्या दुरुस्तीकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली नाही.
(३) सदर योजनेची दाबनलिका अंतर ८०० ते २३०० मी. हा भाग काळया मातीच्या स्तरातून जात असल्याने या भागात पाईपलाईनची वारंवार गळती होत असल्यामुळे गावात पाणी पुरवठा खंडित होऊन पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत असल्याचे प्रत्यक्ष पाहणीदरम्यान निदर्शनास आले. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१४-२०१५ च्या कृती आराखड्यात सदर गावाचा समावेश करण्यात आला आहे. अस्तित्वातील उंच टाकी व पुरवठा विहीर यांचा समावेश करुन नवीन योजना जिल्हा स्तरावर मंजूर करण्यात आली आहे. सदर योजनेच्या निविदाबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वार्षिक योजनेचे आकारमान कमी करुन ते निधीच्या उपलब्धतेनुसार ठेवण्याचा प्रस्तावाबाबत**

**(७) ८७८६ (०७-०४-२०१५). श्री. मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वार्षिक योजनेचे आकारमान कमी करुन ते निधीच्या उपलब्धतेनुसार ठेवण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विचाराधीन प्रस्तावावर केव्हापर्यंत अंमलबजावणी होणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०४-२०१५) :**१) व २) नाही.
उपलब्द साधनसंपत्तीच्या मर्यादेत, सन २०१४-१५ च्या रु.५१२२२.५४ कोटी रकमेच्या वार्षिक योजनेच्या तुलनेत सन २०१५-१६ च्या वार्षिक योजनेचे आकारमान रु. ५४९९९.०० कोटी इतके प्रस्तावित केले आहे.

---

**भंडारा जिल्हयातील शेतक-यांना कृषि विभागाच्या योजनांची माहिती शेतकऱ्यांना पोहचत नसल्याबाबत**

**(८) ८८२० (०४-०५-२०१५). श्री. रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारमार्फत वैयक्तिक लाभाच्या अनेक योजना शेतकऱ्यांसाठी राबविल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये फुलपिके,कंदफुले,सुटीफुले नविन बागीचा स्थापन करणे, आदर्श रोपवाटिका, बीजउत्पादन ,हरितगृह,सामुहिक तळे,प्लॉस्टिक अच्छादन, सेट-नेट या योजनेची माहिती भंडारा जिल्हयातील शेतकऱ्यांना दिली जात नसल्याचे माहे जानेवारी,२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याच्या जबाबदारी संबंधित अधिका-यांवर असूनही ही योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नसल्याचे आढळून आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासन कोणती कडक कारवाई करणार आहे वा करित आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०५-२०१५) :** (१) होय.
(२) नाही. कृषि विभागामार्फत राबविण्यातय येणाऱ्या योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यत दैनिक वृत्तपत्रो, शेतकरी प्रशिक्षण वर्ग व पोस्टर्स, लीफलेट आवाहनाद्वारे, प्रसिध्दी केली जाते. सन २०१४-१५ या वर्षात भंडारा जिल्हयातील १६ शेतकऱ्यांना तळेगाव दाभाडे, जि.पुणे, येथे शेडनेट व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणाकरिता पाठविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा (जि.भंडारा) शेतीतील विद्‌युत बिल मिटरचे फोटो न काढता जास्त दर आकारणी करुन बिल पाठविले जात असल्याबाबत**

**(९) ८८२१ (०४-०४-२०१५). श्री. रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयातील पवणी तालुक्यातील चौरास भागातील प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतात बोरवेल किंवा विहिरीवर मोटारपंप बसविले आहे परंतु महिन्याकाठी येणारे विद्‌युत बिल मिटरचे फोटो न काढता पाठविले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कित्येकांना ज्यास्तीचे बिल आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर ज्यास्तीचे बिल आकारण्यात येत असून त्याची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही करणार आहे वा ककरण्यात येत आहे
(५) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही. भंडारा जिल्हयातील पवनी तालुक्यात एकूण ७७२२ कृषीपंप ग्राहक असून १०० टक्के ग्राहकांना विद्‌युत मिटरद्‌वारे विज पुरवठा करण्यात येतो. तसेच कृषी ग्राहकांना योग्य रिडींगप्रमाणे बिल मिळावे म्हणून फोटोरिडींगनुसार बिलींग करण्यात येते.

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा (जि.भंडारा) शहरात वाहतूक नियंत्रक दिव्याची दुरुस्तीकरुन नविन वाहतूक नियंत्रक दिव्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत

**(१०) ८८२४ (०६-०४-२०१५). श्री. रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा शहरात ८ वर्षापूर्वी प्रायोगिक स्तरांवर शहरातील जिल्हा परिषद चौकात वाहतूक नियंत्रण दिवे लावण्यात आली होती, परंतू काही दिवसातच सदर दिवे बंद अवस्थेत पडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रायोगिक तत्वावर लावण्यात आलेले दिव्याचे नगरपालिकेने वीज बिलाचे देयक भरले नसल्याने बंद अवस्थेत पडले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दुसऱ्या ठिकाणी नवीन दिवे लावण्याचा प्रस्ताव रखडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने नगरपालिकेच्या मुख्य चौकात वाहतुक नियंत्रण दिवे कार्यान्वित राहण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०५-२०१५) :** (१), (२), (३), (४) व (५) भंडारा शहरात ८ वर्षापूर्वी प्रायोगिक स्तरांवर शहरातील जिल्हा परिषद चौकात लावण्यात आलेले वाहतूक नियंत्रण दिवे सद्या बंद पडले आहेत. याबाबत नगरपरिषदेकडे कुठलेही वीज बिल प्रलंबित नाही.

नगरपरिषदेच्या मुख्य चौकात वाहतुक नियंत्रण दिवे कार्यान्वित करण्याबाबत भंडारा नगरपरिषदेने सर्वसाधारण सभा क्रमांक १३, दिनांक २५.०८.२०१४ नुसार ठराव पारित केला आहे. सदर ठरावानुसार अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावरुन सुरु आहे.

---

## भंडारा जिल्हयातील धनकचरा निर्मुलन केंद्र ओस पडल्याबाबत

**(११) ८८२९ (०६-०४-२०१५). श्री. रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा नगरपालिकेने कोटयावधी रुपये खर्च करुन निर्माण केलेल्या कचरा निर्मूलन प्रकल्पाला भंगाराचे स्वरुप आले असून कचरा व घाणीमुळे आजूबाजूच्या परिसराचे उकीरडयामध्ये रुपांतर झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या केंद्राचा कोणताही उपयोग होत नाही व केंद्र बेवारस स्थितीत असल्यामुळे चोरानी लाखो रुपयांचे साहित्य लंपास केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०५-२०१५) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) भंडारा नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणीच्या विविध प्रक्रियांबाबत श्री. विवेक चेटूले, प्रो.ओम ॲग्रोटेक, समर्थ नगर मुरमाडी तालुका लाखणी, जि. भंडारा विरुध्द अध्यक्ष नगरपरिषद भंडारा या न्यायप्रविष्ट प्रकरणाचा दिनांक १६.१०.२०१४ रोजी आदेश पारित झाला आहे. त्यानुसार पुन्हा घनकचरा व्यवस्थापनाबाबत प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. ही कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर अंतिम टप्प्यात आहे.

---

## मुरमाडी(जि.भंडारा) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन विकास अधिकाऱ्याची रिक्त जागा भरण्याबाबत

**(१२) ८८३४ (३०-०४-२०१५). श्री. रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री. राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरमाडी (जि.भंडारा) येथील दवाखान्यात २०१३ नंतर येथे स्थायी पशुधन विकास अधिकारी देण्यात आले नाही व श्रेणी १ च्या पशुवैद्यकीय दवाखान्याची धुरा चतुर्थ श्रेणी परिचारांवर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परिणामी परिसरातील १७ गावांतील शेतकऱ्यांना त्यांच्या पशुधनावर उपचार खाजगी पशुवैद्यकांकडून कडून घ्यावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पशुवैद्यकीय विभागाच्या अनेक योजना पशुपालकांपर्यत पोहचत नसल्याने येथील पशुपालकांना योजनापासून वंचित राहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आह,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला असून पशुपालकांना नियमित सेवा पुरविण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे याबाबत लोकप्रतिनिधी किंवा शेतकऱ्यांकडून कुठल्याही तक्रारी प्राप्त नाहीत. जिल्ह्यातील पशुपालकांना विभागाच्या विविध योजनांचा लाभ चालू वर्षात सुध्दा देण्याची कार्यवाही सुरु आहे.

पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त असलेली एकूण ३७२ पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्यात आले होते.

त्यानुसार आयोगाने दि.१२.३.२०१५ रोजी ३०० पात्र उमेदवारांची वैद्यकीय तपासणी व पूर्व चारित्र्य पडताळणी करुन त्यांना पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा (जि.भंडारा) जिल्हयातील शेतक-यांचे वन विभागाकडे अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(१३) ८८३५ (०७-०४-२०१५). श्री. रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात वन्य प्राण्यांकडून झालेल्या पिक नुकसानीबाबत भरपाई मिळावी यासाठी शेतक-यांचे शेकडो प्रस्ताव वन विभागाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंडारा जिल्हयात उमरेड-क-हांडला, कोका, न्यू नागझिरा असे तीन अभायारण्याची निर्मिती झाली याशिवाय आढयाळ, लाखांदूर, तुमसर मोहाडी या तालुक्यातही घनदाट जंगल असून तेथील प्राण्यांपासून शेतपिकांचे व जीवहानीचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शेतक-यांच्या पिकाचे झालेले नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहेत काय,
(४) असल्यास, किती शेतक-यांचे पिकांचे नुकसान झाले आहे,
(५) असल्यास, पंचनाम्यानूसार शेतक-यांना किती नुकसान भरपाई देण्यात आली आहे,
(६) अद्यापपर्यंत नुकसान भरपाई दिली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) भंडारा जिल्हयात सन २०१२-१३ ते सन २०१५-१६ आजपावेतो वनप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्याची ४११८ प्रकरणे निदर्शनास आली असून ४०४९ प्रकरणात नुकसान ग्रस्त शेतकऱ्यास रु. १,९६,९९,१६०/- इतकी रक्कम अदा करण्यात आली असून सन २०१५-१६ मधील ६९ प्रकरणात रु. ५,२५,०००/- इतकी रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यास अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहर व उपनगरात विशेषतः झोपडपटटी परिसरात हजारो नागरिक आधारकार्डपासून वंचित असल्याबाबत**

**(१४) ८८५३ (०६-०४-२०१५). श्री. योगेश सागर (चारकोप), श्री. बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आधारकार्ड सर्वच शासकीय कार्यालयात, बँकेचे व्यवहार, सिलिंडरमध्ये सबसिडी तसेच इतर कामासाठी आधारकार्ड बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहर व उपनगरात विशेषतः झोपडपटटी परिसरात आज ही हजारो नागरिक आधारकार्डपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास आधारकार्ड काढण्यासाठी सध्या एका विधानसभाक्षेत्रात एकच केंद्र आहे त्यामुळे नागरिकांचे हाल होत असल्याने प्रत्येक मोठया वस्त्यांमध्ये एक आधारकार्ड केंद्रे असावे अशी नागरिकांची मागणी आहे, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१५) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रत्येक तहसिलमध्ये प्रमाणकापेक्षा जास्त आधार कार्ड केंद्र स्थापन करण्यात आली आहेत. तसेच आधार कार्ड नोंदणीकरिता आंगणवाडी व शाळांमध्ये विशेष शिबीर आयोजित केले आहेत व करण्यात येतील.

---

**जळगांव जिल्हयात स्वस्त धान्यचा काळाबाजार रोखण्याकरिता**
**ग्राम दक्षता समिती गठीत करण्याबाबत**

**(१५) ८९०७ (०७-०४-२०१५). श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जिल्हा व तालुका पातळीवरील स्वस्त धान्य दुकानांच्या धान्य वितरण प्रणालीवर लक्ष ठेवण्यासाठी दक्षता समित्या कार्यरत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) तसेच, जळगांव जिल्हयातील ११५१ ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ३ हजार ४९९ अधिक स्वस्त धान्य दुकानातून गोर गरिबांसाठी असणाऱ्या स्वस्त धान्याचा काळाबाजार होऊ नये म्हणून ग्राम दक्षता समिती गठीत करण्यासाठी आणि स्वस्त धान्याचा काळाबाजार रोखण्यासाठी शासनाकडून अन्य कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) जळगांव जिल्हयातील १५ तालुक्यात एकूण ११५१ ग्रामपंचायती असून ग्रामपंचायतस्तरावरील कार्यरत असलेल्या ग्रामदक्षता समित्यांची संख्या ११५१ आहे. तसेच राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण करण्याचा प्रकल्प दिनांक ११ मार्च, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार दोन टप्प्यात राबविण्यात येणार आहे. टप्पा १ मध्ये सर्व शिधावाटप कार्यालयातील कामांचे संगणकीकरण व लाभार्थी कुटुंबाला संगणकीकृत शिधापत्रिका देणे या बाबींचा समावेश आहे. टप्पा क्रमांक २ मध्ये रास्तभाव दुकानातील व्यवहारांचे संगणकाद्वारे व्यवस्थापन करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त अन्नदिन, अन्न सप्ताह व ट्रक ट्रॅकिंग या उपाययोजना राबविण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड शहरात नोव्हेंबर महिन्यात वीजबिले जास्त येत आसल्याबाबत**

**(१६) ८९१९ (०४-०४-२०१५). श्री. भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड शहरात माहे नोव्हेंबर, २०१४ ची वीजबिले जास्त प्रमाणात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात महावितरणाच्या कार्यालयाशी नागरिकांनी संपर्क साधला असता आय.आर.मशीन बंद पडल्याने तीन ट्रान्सफार्मवरील ग्राहकांना ४५ दिवसांचे बिल दिले असल्याचे स्पष्ट केले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, तद् नुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तीवर कोणती कारवाई केली आहे काय, वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) महाड शहरातील रोहित्र क्र.४१३०११३, ४१३०११६, १३०००१० वरील ग्राहकांचे मीटर हे आय.आर.प्रकारचे असल्याने मीटर रिडींग हे H.H.U. उपकरणाद्वारे घेतले जाते व नंतर संगणक प्रणालीकडे पाठविले जाते. नोव्हेंबर २०१४ मध्ये H.H.U. उपकरणात दोष निर्माण झाल्यामुळे वरील रोहित्रावरील ग्राहकांचे रिडींग संगणक प्रणालीकडे वेळेत वर्ग झाले नाही व सदर ग्राहकांचे पुन्हा रिडींग घेण्यात आले त्यासाठी जास्त दिवस लागल्याने ग्राहकांना ४५ दिवसांचे नोव्हेंबर २०१४ चे बिल देण्यात आले व ग्राहकांचे कुठलेही आर्थिक नुकसान न करता ३० दिवसांचे स्थिर आकार व १५ दिवसांचे स्थिर आकार समायोजीत करुन बिल दुरुस्त करुन देण्यात आलेले आहेत.

(४) सदरचा दोष हा H.H.U. उपकरणात निर्माण झाल्यामुळे संबंधित कंपनीकडे दुरुस्तीसाठी पाठविण्यात आले होते व दुरुस्त झाल्यानंतर सद्यस्थितीत वापरात आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील ११२५ अंगणवाडयांना स्वतःची इमारती नसल्यामुळे त्यांना भाज्याच्या इमारतीमध्ये अंगणवाडया घ्याव्या लागत असल्याबाबत**

**(१७) ८९३६ (०७-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री. सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील ११२५ अंगणवाडयांना स्वतःची इमारती नसल्यामुळे त्यांना भाज्याच्या इमारतीमध्ये अंगणवाडया घ्याव्या लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडयासाठी स्वतःची इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्‌याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :** (१) नाही हे खरे नाही.

सोलापूर जिल्ह्यामध्ये ग्रामीण प्रकल्पांतर्गत एकूण ३२६९ अगणवाडी केंद्र असून त्यापैकी २१९२ अंगणवाडी केंद्राला स्वतःच्या इमारती उपलब्ध आहेत. ७७० अंगणवाड्या प्राथमिक शाळेच्या खोल्यामध्ये भरविल्या जातात. २२२ अंगणवाड्या ग्रामपंचायत इमारतीमध्ये भरविल्या जातात. ६२ अंगणवाड्या समाजमंदिरात भरविल्या जातात. सोलापूर जिल्ह्यामध्ये करमाळा या ग्रामिण प्रकल्पात ११ अंगणवाड्या व उत्तर सोलापूर या ग्रामिण प्रकल्पात १२ अंगणवाड्या भाड्याच्या इमारतीमध्ये भरविल्या जात आहेत. तसेच सोलापूर जिल्ह्यात नागरी प्रकल्पांतर्गत एकूण ५१९ अंगणवाडी केंद्र असून त्यापैकी २२ अंगणवाडी केंद्र शासकीय इमारतीत भरविली जातात व उवरीत ४९७ अंगणवाडी केंद्र भाड्याच्या इमारतीत भरविली जातात.

(२) अंगणवाड्यासाठी स्वतःच्या इमारती बांधण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून सन २०१४-१५ मध्ये रुपये १४ कोटी ५० लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. यातून एकूण ३६७ अंगणवाडी इमारत बांधकाम करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. सदरची कामे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला पुर्ण करण्यासाठी सोपविण्यात आलेली आहेत.

सन २०१५-१६ मध्ये जिल्हा नयोजन समितीकडून रु.१५ कोटी इतका नियतव्यय मंजूर करुन घेण्यात आलेला आहे. यातून ३०० अंगणवाड्याच्या इमारती बांधण्यंचे नियोजन करण्यात आलेले आहे. चालू वर्षी सदरचा निधी प्राप्त होताच अंगणवाड्याच्या इमारती बांधकामे सुरु करण्यात येणार आहेत. तसेच सन २०१६-१७ मध्ये उर्वरित ४१० अंगणवाड्या इमारतीसाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधी उपलब्ध करुन घेऊन इमारती बांधकामाचा इष्टांकपूर्ती करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

नागरी भागात अंगणवाडी केंद्र बांधकामासाठी आवश्यकतेनुसार व जागेच्या उपलब्धतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शिरापूर उपसा सिंचन योजनेपाठोपाठ आता रेशीम पार्क हा माळढोक बाधित क्षेत्रात अडकल्याने तरतूद केलेला निधीही परत करण्यात आल्याबाबत**

**(१८) ८९४२ (१०-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वस्त्रोद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शिरापूर उपसा सिंचन योजनेपाठोपाठ आता रेशीम पार्क हा माळढोक बाधित क्षेत्रात अडकल्याने तरतूद केलेला निधीही परत करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित क्षेत्रासाठी निधीची कमतरता व माळढोकची अडचण होत असल्याने परत गेलेल्या निधीची तातडीने पूर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरील निधी पुन्हा कधी मिळणार आहे,
(४) अद्याप, उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०५-२०१५) :** (१) सोलापूर येथे राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत रेशीम पार्क मंजूर करण्यात आले आहे. त्यासाठी आवश्यक सर्व निधीही कृषि विभागाकडून उपलब्ध झाला होतो. तथापिक सदर जमिन माळढोक उभयारण्यासाठी अिधसूचत करण्यात आल्याचे निदेर्शनास आल्याने तसेच केंद्रीय वन्यजीव मंडळाची मंजूरी आल्याशिवाय त्या जागेवर कोणतही पुढील का करणे शक्य नव्हते. उपलब्ध निधी दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंत खर्च होणार नसल्याने कृषि विभागाच्या सूचनेनुसार तो समर्पित करण्यात आला आहे. रेशीम पार्कसाठी सोलापूर येथेच सोयीस्कर जागा उपलब्ध करुन घेण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे जागा उपलब्ध झाल्यावर रेशीम पार्क उभारण्याचे शासनाच्या विचाराधिन आहे.

---

**कोल्हापूर - सांगली जिल्ह्यातील वारणा नदीपात्रात मगरीची संख्या वाढल्याने वारणानदी काठावरील ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेली घबराट**

**(१९) ८९५३ (०७-०४-२०१५). श्री. जयंत पाटील (इस्लामपूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर - सांगली जिल्ह्याचा दुवा साधणा-या वारणा नदीपात्रात मोठया प्रमाणात मगरीची संख्या वाढल्याने वारणानदी काठावरील ग्रामस्थांत प्रचंड प्रमाणात घबराट निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मगरीपासून नागरीक व जनावरे यांचेवर मगरीचे हल्ले होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा नदीपात्रात मगरीचे वास्तव्य आहे हे खरे आहे. कोल्हापूर-सांगली जिल्ह्याचा दुवा साधणा-या वारणा नदीपात्रात मागरींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने वारणा नदी काठावरील ग्रामस्थात घबराट निर्माण झाल्याची बाब खरी नाही.
(२) नागरी कव जनावरे यांचेवर मगरीचे हल्ले होऊ नयेत म्हणून वनविभागातील कर्मचा-याकडून नागरीकामध्ये वेळोवेळी जनजागृती करण्यात येते. यासाठी अशासकीय स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घेणेत येत आहे. तसेच जनमानसांत प्रबोधन होणेसाठी नदी किनारी माहितीदर्शक फलक लावण्यात आले आहेत. तसेच याबाबत मद्रास क्रोकोडईल पार्क व मगरतज्ञ डॉ.गौरी मल्लापूरे-तिलारी बायोडाव्हर्सिटी ट्रस्ट यांचे सहकार्य व मार्गदर्शन घेणेत येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील कोरेगाव पंचायत समितीची इमारत मोकडकळीस आल्याबाबत**

**(२०) ८९९९ (०८-०४-२०१५). श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील कोरेगाव पंचायत समितीची इमारत मोकडकळीस आल्याने नवीन इमारत बांधण्यासाठी सन २०१३ मध्ये मंजूरी मिळूनही सदर इमारत बांधण्यास अद्याप सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर इमारतीसाठी निधी उपलब्ध करुन सदर इमारतीचे बांधकाम तातडीने पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलीवा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०५-२०१५) :** (१) होय.

(२) कोरेगाव पंचायत समिती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम मंजूर प्रस्तावित जागेत न करता माफ्कोच्या अधिपत्याखालील जागेवर करण्याचे सन्माननीय लोकप्रतिनिधींनी सुचविले असून, सदर जागा उद्याप उपलब्ध न झाल्याने पंचायत समितीचे बांधकाम अद्याप सुरु झालेले नाही.

(३) सदरहु बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, सातारा यांच्या कडून सुरु आहे. जागा उपलब्ध झाल्यानंतर या कामी प्रचलित कार्य पध्दतीनुसार कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर उपलब्धतेनुसार व कामाच्या टप्प्यानुसार आवश्यक निधी जिल्हा परिषदेला वितरीत केला जाईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लांजा तालुक्यातील (जि.रत्नागिरी) रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(२१) ९०३३ (१०-०४-२०१५). श्री. संजय कदम (दापोली), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. जयंत पाटील (इस्लामपूर), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा-साटवली मार्गावरील (जि.रत्नागिरी) कोत्रेवाडी ते पालवेवाडी दरम्यानच्या दीड किलोमीटर तसेच लांजा ते साटवली येथील २५ कि.मी. रस्त्याची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच आसगे- तळवडे तसेच रुग्ण साटवली मार्गावरील घाटातील डोंगराचे कटिंग धोकादायक बनलेले असून पावसाळ्यात दरडी रस्त्यावर येऊन रस्ता बंद होऊन अनेक वेळा वाहतूक कोंडी निर्माण होत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोत्रेवाडी ते पालवेवाडी, लांजा ते साटवली या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत तसेच आसगे-तळवडे तसेच रुग्ण साटवली मार्गावरील दरडी रस्त्यावर येत असल्यामुळे शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०५-२०१५) :** (१) व (२) नाही.

(३) आसगे तळवडे या रस्त्याच्या कि.मी. ७/३००मध्ये जवळ पावसाळ्यात दरड कोसळून माती खाली आली होती. परंतु वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण झाला नव्हता. रस्त्याच्या कडेला आलेली माती आवश्यकतेनुसार बाजुला करण्यात आली होती. गटारात पडलेली माती काढण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### भिवंडी (जि.ठाणे) येथील शेतक-यांच्या भातास योग्य भाव मिळावा म्हणून बंद केलेली भात खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत

**(२२) ९०४२ (०७-०४-२०१५). श्री. संजय कदम (दापोली), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील भातखरेदी केंद्रे ठेकेदाराने माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या सप्ताहात बंद केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(३) तसेच शेतक-यांच्या भातास योग्य भाव मिळावा महणून बंद केलेली भत खरेदी केंद्र सुरु करावीत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१६-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) कोकण विभागातील हंगाम २०१३-१४ मध्ये खरेदी केलेल्या धानाची भरडाईसाठी उचल न झाल्यामुळे तसेच हंगाम २०१०-११ ते २०१२-१३ चे गोदाम भाडे रु. ५,४२,९३८/- शासनाकडून अप्राप्त आहेत. तसेच यापूर्वी शासनाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दराने गोदाम भाडे मिळत होते. परंतू केंद्र शासनाने दोन महिन्याचे गोदाम भाडे प्रति क्विंटल रु. २.०८ व रु. २.४० या दराने देण्याचे निश्चित केले आहे.

(३) दि.०२.१२.२०१४ पासून पणन महासंघाच्या गोदामात हंगाम २०१४-१५ मधील धान खरेदी सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वर्धा जिल्हा मध्यवर्ती बॅकमध्ये जिल्हा परिषदेचे**
**९१ कोटी ३७ लक्ष रुपये अडकले असल्याबाबत**

**(२३) ९१३६ (०८-०४-२०१५). श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हा परिषदेचे ९१ कोटी ३७ लक्ष रुपये विकास निधी मागील दोन वर्षापासून वर्धा जिल्हा मध्यवर्ती बॅकमध्ये अडकुन पडलेला असून त्यामुळे वर्धा जिल्ह्यातील विकास कामे ठप्प पडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रक्कम प्राप्त करण्याकरीता जिल्हा परिषद प्रशासनाने दोन वर्षात कोणतीही कायदेशीर कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नोक्त संदर्भान्वये सभागृहाला आश्वासित केल्यानुसार माहे जानेवारी, २०१५ अखेरपर्यंतची वस्तुस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेतील निधी परत मिळत नसल्याने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी कोषागाराचे चेअरमन व जनरल मॅनेजर दि. १०/८/२०१३ रोजी नोटीस देण्यात आली असून मा.उच्च न्यायालय, नागपूर येथे दि. २०/३/२०१५ रोजी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक, वर्धा यांच्या विरोधात रीट पिटीशन दाखल करण्यात आले आहे.

(३) मा.उच्च न्यायालय, नागपूर येथील रीट पिटीशन दाखल करण्यात आले असून सदर प्रकरणी अद्याप न्यायालयाचे अंतिम आदेश प्राप्त झालेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई ठाणे परिसरात खाजगी वनक्षेत्राती बांधकाम नियमित करुन**
**जागेच्या सातबारावरुन वन विभागाच्या नोंदी रद्द करण्याबाबत**

**(२४) ९१४० (०९-०४-२०१५). श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ठाणे परिसरात खाजगी वनक्षेत्रात राहणाऱ्या लाखो नागरीकांचे वास्तव्य असलेली बांधकामे नियमित करुन जागेच्या सातबारावरुन वन विभागाच्या नोंदी रद्द करण्याचे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कारवाई व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक कार्यवाही करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०५-२०१५) :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या स्पेशल लिव्ह पिटीशनमधील सिव्हील अपलि क्रमांक ११०२ ते ११०२/२०१४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३०.०१.२०१४ रोजी निर्णय दिला आहे. सदर निर्णयानुसार शासनाच्या दि.१२.१२.२०१४ पत्रान्वये प्रकरण निहाय कार्यवाही करताना मा.सर्वोच्च न्यायालयाचे अवमान होणार नाही यंची दक्षता घेण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व ठाणे यांना दिले होते.
(२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ३०.०१.२०१४ रोजीच्या निर्णयाच्या अनुपालनार्थ दपरोक्त नमूद दिनांक १२.१२.२०१४ रोजीच्या शासनपत्रातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अपंगांच्या अनुदानित शाळांमधील कर्मचा-यांना**
**शासकीय योजनांचा लाभ मिळणेबाबत**

**(२५) ९१८२ (०९-०४-२०१५). श्री. अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यात अपंगांना विशेष शिक्षण व प्रशिक्षण देणा-या ७०० पेक्षा जास्त विशेष शाळा व कार्यशाळा महाराष्ट्र शासन मान्य अनुदानित असून त्यात अंदाजे ९००० शिक्षक व कर्मचारी कार्यरत असून यापैकी अंदाजे ८०० कर्मचारी हे कार्यशाळेचे आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच, विशेष शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना १९८९ पासून निवृत्ती वेतन व उपदान योजना लागू असून, तथापि दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वीपासून अपंगांच्या शासन मान्य अनुदानित कार्यशाळेतील निदेशक व कर्मचारी मिळून अंदाजे शासन दरबारी येऊन संबंधित विभागांना निवेदन देऊन पाठपुरावा करत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्मचा-यांना उक्त योजनेचे लाभ मिळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-०५-२०१५) :** (१) सध्या राज्यात ७२९ शाळा/कर्मशाळा कार्यरत असून त्यापैकी ८६ कर्मशाळेमध्ये ७६६ कर्मचारी कार्यरत आहेत.
(२), (३) व (४) कर्मशाळेतील कर्मचा-यांना सेवानिवृत्ती योजना लागू करण्याबाबतच्या प्रस्तावावर विचार सुरु आहे.

---

**दिंडोरी (जि.नाशिक) तालुक्यातुन जाणा-या उच्च दाब क्षमतेच्या विज वाहिनीचे कामास स्थानिक शेतक-यांचा विरोध असल्याबाबत**

**(२६) ९२०५ (०४-०४-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडोरी (जि.नाशिक) तालुक्यातुन जाणा-या उच्च दाब क्षमतेच्या विज वाहिनीचे कामास स्थानिक शेतक-यांचा विरोध आहे हे खरे आहे काय.

(२) असल्यास शेतक-यांच्या विरोधाला न जुमानता उच्च दाब वाहिनीचे कामास पॉवरग्रीड कंपनाने माहे जानेवारी २०१५ मध्ये सुरुवात केली आहे हे खरे आहे काय.

(३) असल्यास या विरोधात शेतक-यांनी आत्मदहनाचा इशारा देखील दिलेला आहे हे खरे आहे काय.

(४) असल्यास शासनाने सदरच्या कामाबाबत व शेतक-यांना न्याय मिळवुन देण्याचे दृष्टीने काय कारवाई करीत आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०६-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर प्रकरणी पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.यांचे मार्फत इलेक्ट्रीसिटी कायदा, २००३ व टेलीग्राफ कायदा १८८५ नुसार फेर सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. या कायद्यानुसार अति उच्च दाबाची विद्युत वाहीनी ही कमी लांबीच्या मार्गाने कमीत कमी शेतकरी वर्ग प्रभावित होईल व पायाभूत सुविधा तसेच, वन क्षेत्रावर ताण पडणार नाही अशा पध्दतीने स्थापीत करण्याबाबतची तरतूद आहे. परंतु नविन मार्ग या तरतुदींच्या निकषात बसत नसल्यामुळे नविन मार्गाने सदरची अति उच्च दाब वाहीनी टाकणे संयुक्तिक होणार नसल्याचे पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांनी कळविले आहे. याबाबत सर्वमान्य तोडगा काढण्याच्यादृष्टीने जिल्हादंडाधिकारी/संबंधित उपविभागीय दंडाधिकारी यांचे स्तरावर संबंधितासमवेत बैठका घेण्यात आल्या असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**आलेगाव पागा (ता.शिरुर,जि.पुणे) येथे जलशुध्दीकरण मशीन बसविण्याबाबत**

**(२७) ९२३४ (०७-०४-२०१५). श्री. लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आलेगाव पागा (ता.शिरुर,जि.पुणे)येथे नागरिकांना पिण्याचे पाणी शुध्द मिळावे यासाठी शासकीय योजनेतून जलशुध्दीकरण मशीन मंजूर झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलशुध्दीकरण मशीन ग्रामपंचायतीने नागरिकांच्या सोयीच्या ठिकाणी बसवून त्वरीत कार्यवाही करावी यासाठी ग्रामसभेत ठराव झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आलेगाव पागा येथील जास्त बागायती क्षेत्रामुळे जमिनीतील पाण्यामध्ये क्षारांचे प्रमाण खूपच असल्याने तेथील पिण्याचे पाणी अशुध्द असल्याबाबतचा अहवाल प्राथमिक आरोग्य केंद्राने दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०५-२०१५) :** (१) व (२) होय. हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
जिल्हाधिकारी, पुणे व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांनी पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बाधित आढळल्याबाबत निश्चित केलेल्या गावामधील आहे.
(४) पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडून जलशुध्दीकरण मशीन बसविण्यासाठी निधी उपलब्ध झाला आहे. त्याकरिता आवश्यक जोड पाईपलाईन व मशीनची उभारणी करण्यात आली आहे. आलेगाव पागा ग्रामपंचायतीने विद्युत जोडणीचे कोटेशन मागविले आहे. विद्युत जोडणी करुन जलशुध्दीकरण मशीन कार्यान्वित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतक-यांना कृषिपंप पुरविण्याबाबत

**(२८) ९२५२ (०४-०४-२०१५). श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतक-यांना दरवर्षी पाच लाख कृषिपंप देण्याची शासनाने निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, शेतक-यांना कृषिपंप पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०५-२०१५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) शासन निर्णय दि.२७ मार्च, २०१५ अन्वये विहीत केलेल्या पात्रता व ५ एकर पेक्षा कमी जमिनीचे क्षेत्र असणाऱ्या शेतक-यांना ३.५ किंवा ७.५ एचपी क्षमतेचे सौर कृषिपंप देण्याच्या/ आस्थापित करण्याच्या योजनेस मान्यता देण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या योजनेनुसार महाराष्ट्र राज्यात एकूण ७५४० सौर कृषि पंपांचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे.

(३) शासन निर्णय दि.२७ मार्च, २०१५ अन्वये स्थापन केल्यानुसार दि.५ मे, २०१५ रोजी सुकाणू समितीची बैठक होऊन त्यामध्ये टेंडर समिती व तांत्रिक समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समित्यांमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयाच्या विकास नियोजन आराखड्याबाबत**

**(२९) ९२८१ (०८-०४-२०१५). ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयाचा समतोल साधण्याच्या दृष्टीने दरवर्षी जिल्हा विकास नियोजन आराखडा तयार करण्यात येत असून सन २०१४ - १५ या आर्थिक वर्षात विदर्भासाठी कोटयावधीचा विकास आराखडा मंजुर करण्यात मात्र निधी अभावी आजही अनेक विकास कामे रखडली असल्याचे माहे जानेवारी २०१५ रोजी वा त्यानुसार आढळून आले हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, विदर्भातील रखडलेली विकास कामे पूर्ण करण्याबाबत तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याने विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०५-२०१५) :** (१), (२) व (३) अमरावती जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समिती, अमरावती कडून दरवर्षी योजना आराखडा तयार करण्यात येतो.

अमरावती जिल्ह्यासह विदर्भातील सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा वार्षिक योजना सन २०१४-१५ साठी (सर्वसाधारण, अनुसुचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना आणि आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्र योजना) एकूण रु.२९६१.०१ कोटी निधी अर्थसंकल्पित करुन त्यापैकी रु.२८१९.५७ कोटी वितरित करण्यात आला आहे. सबब, निधी अभावी विकास कामे रखडली असे म्हणता येत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील रखडलेली आणि अनुशेषातर्गत पूर्ण होणे अपेक्षित असलेले सिंचन प्रकल्पांची काम वेगाने करण्याबाबत**

**(३०) ९२८२ (०७-०४-२०१५). ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील रखडलेली आणि अनुशेषातर्गत पूर्ण होणे अपेक्षित असलेले सिंचन प्रकल्पांची काम वेगाने करण्याबाबत निविदा मागविण्याचे काम जलद गतीने होण्यासाठी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(२) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१५) :** (१) व (२) अमरावती जिल्ह्यातील पाटबंधारे विकास क्षेत्रातील अनुशेष निर्मुलन करण्यासाठी प्रगतीपथावरील प्रकल्पांची कामे निविदा प्रक्रियेसाठी रखडलेली नाहीत. प्रकल्प कामांच्या आवश्यकतेप्रमाणे व शासनाच्या निविदेबाबतच्या प्रचलित नियमांचे पालन करुन वेळोवेळी निविदा मागविण्यात येत आहेत. त्यामुळे उक्त प्रकरणी विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरुड (जि. अमरावती) तालुक्यातील शिधावाटप दुकानातून निकृष्ट दर्जाच्या ज्वारीची होत असलेली विक्री**

**(३१) ९२८८ (०७-०४-२०१५). प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड (जि. अमरावती) तालुक्यातील शिधावाटप दुकानातून किड लागलेल्या निकृष्ट दर्जाच्या ज्वारीची विक्री होत असल्याचा प्रकार माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर तालुक्यात नाफेड अंतर्गत सन २०१३ मध्ये हमी भावाने ८०८ क्विंटल ज्वारी आणि ३२८ क्विंटल मका खरेदी करण्यात आला होता सदर धान्य रोशनखेडा फाट्यावरील एका खाजगी गोडावूनमध्ये ठेवण्यात आले होते परंतू या ज्वारीला भिरड लागली असून सदर निकृष्ट ज्वारी रेशन दुकानातून रेशनकार्ड धारकांना विकत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०७-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

अमरावती जिल्ह्यामध्ये वरुड तालुक्यात सन २०१३ मध्य हमी भावाने ८०८ क्किंटल ज्वारी व ३२८० क्किंटल मका खरेदी करण्यात आला होता, सदर ८०८ क्किंटल ज्वारी चांगल्या प्रतीचे असल्याचे भारतीय खाद्य निगम यांच्या कडून नियतनाचे आदेश प्राप्त झाले. त्यानुसार ज्वारीचे वितरण हे रास्तभाव दुकानातून करण्यात आले आहे. सदर ज्वारी ही भिरड लागलेली नाही व तशी कोणत्याही शिधापत्रिका धारकांची अथवा लाभार्थ्यांची तक्रार प्राप्त नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील चांदूर रेल्वे भागात रब्बीच्या पिकाचे व त्यासाठी लागणा-या पाण्याचे कुठलेही नियोजन स्थानिक पाटबंधारे कार्यालयाने केले नसल्याबाबत**

**(३२) ९३०१ (०८-०४-२०१५). प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील चांदूर रेल्वे भागात रब्बीच्या पिकाचे व त्यासाठी लागणा-या पाण्याचे कुठलेही नियोजन स्थानिक पाटबंधारे कार्यालयाने केले नसून दरवर्षी स्थानिक परिसरातील मजूर लावून महिन्याभरापूर्वीच सर्व कालवे साफ करण्यात येत होते, परंतु यावर्षी शेतक-यांच्या पेरण्या सुरु झाल्या असतांनाच घाईघाईने कालवे सफाई केली जात असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदारांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील निर्मलग्राम पुरस्कार मिळविलेल्या गावांना शासनाने विशेष दर्जा न देता या गावातील विकासाकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत**

**(३३) ९३२२ (०७-०४-२०१५). डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निर्मलग्राम पुरस्कार मिळविलेल्या गावांना शासनाने विशेष दर्जा न देता या गावातील विकासाकडे दुर्लक्ष होत असल्याचे तसेच निर्मल योजनेनंतर स्वच्छतेबाबत कोणताही उपक्रम शासनाने न राबविल्याने निर्मलगाव मूळपदावर येत आहेत यामुळे सार्वजनिक स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच केरळ, हिमाचल प्रदेश, सिक्कीम या राज्यानी बचतगटांच्या माध्यतातून हगणदारीमुक्त गाव योजनेला गती दिली त्याच धर्तीवर राज्यातही ही पध्दत राबविण्यासंदर्भात कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३०-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही. शासन परिपत्रक क्र.विपआ-१०११/प्र.क्र.६९/पापु-०७, दि.२७ मे, २०११ नुसार निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त गावांना ग्रामीण पाणीपुरवठा योजना राबविताना प्राधान्य देण्यात येते. तसेच शासनाकडून विविध योजनेंतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालय, पंचायत विभागाच्या वतीने घंटागाडी, कचऱ्यापासून खतनिर्मिती करणे इ.उपक्रम राबविण्यात येतात.तसेच गावातील काही प्रतिष्ठित नागरिक, महिला बचतगट अंगणवाडी कार्यकर्त्या, मदतनीस, युवक मंडळे, शाळेतील शिक्षक व विद्यार्थी हे एकत्रित येऊन सार्वजनिक स्वच्छतेकडे तसेच स्वच्छतेबाबत जनजागृती करतात. तसेच वेळोवेळी अधिकाऱ्यांमार्फत क्षेत्रभेटीच्या माध्यमातून ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक स्वच्छतेकडे लक्ष देण्यात येत आहे.
(२) व (३) स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सामुदायिक संघटना, स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. तसेच सन २००९-१० मध्ये स्वच्छतेची व्याप्ती वाढविण्यासाठी महिला बचत गटांच्या माध्यमातून कुटुंब संपर्क अभियान राबविण्यात आले. तसेच जिल्हा परिषदेकडून सर्व ग्रामपंचायत स्तरावर बचत गटाच्या माध्यमातून तसेच प्रबोधनातून हागणदारी मुक्त गाव योजनेची व स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथे गेल्या अनेक वर्षापासून आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली असणा-या पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडे वर्ग करण्याचा निर्णय**

**(३४) ९३२५ (०७-०४-२०१५). डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथे गेल्या अनेक वर्षापासून आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली असणा-या पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडे वर्ग करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यात नवीन दहा उपविभागीय प्रयोगशाळा मंजूर झाल्या असून अद्यापी काम सुरू करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या नवीन प्रयोगशाळांचे काम केव्हापर्यंत सुरू करण्याचा शासनाच्या मानस आहे,
(४) प्रश्न भाग (१) च्या शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून सुरू करण्यात येणार आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (२५-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूक्यूएम-२०१४/प्र.क्र.०८/पापु-१२, दिनांक १८.१२.२०१४ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सनियंत्रणाखाली असलेल्या जिल्हा पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा व उप विभागीय प्रयोगशाळांमध्ये कार्यरत असलेले कंत्राटी मनुष्यबळ, साहित्य पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या सनियंत्रणाखाली घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) व (३) होय. हे खरे आहे.
राज्यात नवीन दहा उप विभागीय प्रयोगशाळा सुरु करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे वितरीत केलेला निधी या विभागाकडे अद्याप हस्तांतरीत करण्यात आलेला नाही. सदर निधी हस्तांतरीत होताच जागेच्या उपलब्धतेनुसार नवीन प्रयोगशाळा सुरु करण्यात येतील.
(४) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सनियंत्रणाखाली असलेल्या जिल्हा पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा व उप विभागीय प्रयोगशाळांमध्ये कार्यरत असलेले कंत्राटी मनुष्यबळ, साहित्य ३१ मार्च, २०१५ अखेर पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांचेकडे हस्तांतरीत करुन घेण्यात आले असून दिनांक ०१ एप्रिल, २०१५ पासून अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे.

---

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या औषध निरिक्षक पदाच्या भरतीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(३५) ९३२७ (०७-०४-२०१५). डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री. पंकज भुजबळ (नांदगाव), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २००७ मध्ये घेण्यात आलेल्या औषध निरिक्षक पदाच्या भरतीतील गैरव्यवहाराप्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार तत्कालिन उपसचिव श्रीमती नि. श. पटवर्धन यांच्यासह ३९ जणांविरुध्द मुंबईतील आझाद मैदान पोलिस ठाण्यात माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,
(२) असल्यास, त्यांचेवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रकरणी आझाद मैदान पोलीस ठाणे एम.ई.सी.आर.क्र. ०३१४, कलम ४०३, ४१८, ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४, १२० (ब), १०९, १९३, ५०६ सह ३४, ४०९ भा.दं.वि. नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्हयाचा तपास चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावर्डे (जि.कोल्हापूर) गावच्या पिण्याच्या पाण्यासाठी उभारण्यात आलेल्या जलकुंभाची झालेली दुरवस्था**

**(३६) ९३२९ (०७-०४-२०१५). डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावर्डे (जि.कोल्हापूर) येथील पिण्याच्या पाण्यासाठी उभारण्यात आलेल्या जलकुंभाचे स्लॅबचे कठडे कोसळत असून धोकादायक जलकुंभाचे निर्लेखन करुन तो उतरुन घेण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी माहे डिसेंबर, २०१४मध्ये वा त्या दरम्यान संबंधित विभागाकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलकुंभ खाली उतरविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही. तथापि, सावर्डे ग्रामपंचायतीच्या दिनांक २६ मार्च, २०१५ रोजीच्या झालेल्या ग्रामसभेमध्ये सदरची टाकी निर्लेखित करण्याबाबत चर्चा करण्यात आली आहे.

(२) ग्रामपंचायतींकडून जिल्हा परिषदेकडे अद्याप टाकीच्या निर्लेखनाबाबतचा प्रस्ताव झाला नसून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यानुषंगाने उचित कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हातकणगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील रूई येथील शाहूकालिन बंधाऱ्याचे संरक्षण कठडे, संरक्षण भिंती व पिलर मोडकळीस आल्याबाबत**

**(३७) ९३३८ (०७-०४-२०१५). डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील रूई येथील शाहूकालिन बंधाऱ्याचे संरक्षण कठडे, संरक्षण भिंती व पिलर मोडकळीस आल्याने तेथील नागरिकांनी पाटबंधारे खात्याकडे वारंवार तीव्र आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंधाऱ्याची पाहणी शासनाने केली आहे काय, या पाहणीनुसार या बंधाऱ्यांच्या दुरूस्तीसाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे,

(३) असल्यास, सदरची दुरूस्तीची काम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) होय, अंशत: खरे आहे. रुई कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. परंतु, तेथील नागरिकांनी आंदोलन केलेले नाही.

(२) सदर बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने त्याची पाहणी क्षेत्रिय अधिकारी यांचेकडे माहे १०/२०१४ मध्ये करण्यात आली असून दुरुस्तीसाठीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सन २०१५-२०१६ मध्ये देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध होणाऱ्या निधीतून दुरुस्ती करणेचे नियोजन आहे.

(३) सन २०१५-२०१६ मधील उपलब्ध निधीनुसार दुरुस्तीची काम करण्यात येईल.

---

**कोल्हापूर जिल्हातील गृहरक्षकांना गत सात महिन्यापासून मानधन न मिळाल्याबाबत**

**(३८) ९३४१ (०६-०४-२०१५). डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)कोल्हापूर येथील गृहरक्षकांना गेल्या सात महिन्यापासून मानधन देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यालयातील जिल्हा समादेशक हे सेवानिवृत्त झाल्याने गृहरक्षकांच्या निधीचा पाठपुरावा केला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गृहरक्षकांना तातडीने मानधन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिधुदुर्ग जिल्ह्यांच्या ग्रामीण भागात विद्युतीकरणाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याबाबत**

**(३९) ९३४४ (०४-०४-२०१५). श्री. वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिधुदुर्ग जिल्ह्यांच्या ग्रामीण भागात विद्युतीकरणाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी विद्युत वितरण कंपनीने ११६ कोटी २६ लाख रुपये खर्चाचा आराखडा प्रस्तावित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावित आराखडयातून गंजलेले खांब बदलणे, मनोरे उभारणे, उपकेंद्र सुरु करणे जुन्या वाहिन्या बदलणे, दारिद्रय रेषेखालील जनतेला वीज कनेक्शन देणे, कृषी पंपांना कनेक्शन देणे अशा विविध योजना राबवून वीज वितरण व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आराखडयावर केव्हा अंमलबजावणी करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर आराखड्यातील पायाभूत आराखडा उभारणी-१, पायाभूत आराखडा उभारणी-२, रोजगार हमी योजना या कार्यरत योजनांपैकीच्या कामांना सुरुवात झाली असून, प्रस्तावित योजनांपैकी अपग्रेडेशन व सक्षमीकरण व नवीन वीज पुरवठा मंजूर असून पुढील कार्यवाही चालू आहे. केंद्र शासनाच्या दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती व आयपीडीएस योजनांना प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाल्यानंतर मंजूर रकमेनुसार तांत्रिकदृष्ट्या प्राधान्यक्रम व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्यता लक्षात घेऊन सदर मंजूर कामांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर सदर कामांना सुरुवात करण्यात येईल.

---

**आकेरी-आंजिवडे घाटाच्या कामाचा विचाराधीन असलेल्या प्रस्तावाबाबत**

**(४०) ९३६३ (१०-०४-२०१५). श्री. वैभव नाईक (कुडाळ), श्री. सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदूर्ग जिल्हयाचा दुर्गम भाग कोल्हापूरला जोडणा-या आकेरी-आंजिवडे घाटाच्या कामाचा विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घाट रस्त्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व यामुळे किती गावांच्या दळण-वळणाची सोय होणार आहे,
(३) अद्याप निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाहीस सुरुवात झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०५-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) सदर घाटामध्ये अनेक ठिकाणी १०० ते १५० मीटर उंचीचे उभे कडे आहेत. त्यामुळे सदर घाटात बांधकाम करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे काय यासाठी सवेक्षण करणे आवश्यक आहे. तसेच या घाटासाठी वनजमिन संपादन करणे आवश्यक आहे. सदर काम सद्यस्थितीत कोणत्याही योजनेत मंजूर अथवा प्रगतीत नाही.

---

**राजापूर तालुक्यातील अंगणवाडया जागे अभावी हक्काच्या इमारतीपासून वंचित असल्याबाबत**

**(४१) ९३६७ (०७-०४-२०१५). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर तालुक्यात (जि.रत्नागिरी) सुमो ३९७ मोठया व मिनी अंगणवाडया असून त्यापैकी सुमारे १४२ अंगणवाडयाची स्वमालकीची इमारत असून उर्वरित अंगणवाडयापैकी १२३ अंगणवाडयातील मुले जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत, १४ ग्रामपंचायत इमारतीत, २२ समाजमंदिरात तर ८१ अंगणवाडरातील मुले खासगी जागेत शिक्षण घेत असलयाचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४-१५ साली तालुक्यातील सुमारे १५ अंगणवाडी इमारतींच्या बांधकामाला मंजुरी मिळाली असून अंगणवाडी इमारतीला प्रत्येक ६ लाख रूपयाचे अनुदान मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तालुक्यातील बहुतांश अंगणवाडया जागे अभावी हक्काच्या इमारतीपासून अद्यापी वंचित आहेत याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(४) तदनुसार स्वमालकीच्या इमारतीच्या प्रतिक्षेत असणा-या अंगणवाडयांना इमारतींकरिता जागा व अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे. मार्च २०१५ अखेर १७७ मोठया अंगणवाडयांकरिता स्वतंत्र इमारती आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) अंगणवाडी इमारतीकरीता संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामस्थ यांनी जागा बक्षीसपत्राने उपलब्ध करुन आवश्यक प्रस्ताव बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यामार्फत जिल्हा परिषद कार्यालयास सादर केल्यानंतर अंगणवाडी इमारत बांधकामासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. सद्य:स्थितीत प्राप्त प्रस्तावांपैकी परिपूर्ण सर्व प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली आहे. एकही परिपूर्ण प्रस्ताव शिल्लक नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील खारभूमी विकासासाठी १५ वर्षापूर्वी तब्बल १७० प्रकल्प निधीअभावी प्रलंबित

**(४२) ९३७३ (०७-०४-२०१५). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील खारभूमी विकासासाठी १५ वर्षापूर्वी तब्बल १७० प्रकल्प मंजूर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पापैकी ६७ प्रकल्प निधीअभावी प्रलंबित आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार उपरोक्त प्रलंबित ६७ प्रकल्पांना तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०५-२०१५) :** (१) नाही.

सन १९५०-८२ मध्ये खारभूमी विकास मंडळाचा बृहत आराखड्या तयार करण्यात आला. त्यानुसार रत्नागिरी जिल्ह्यातील १७० खारभूमी विकास योजनांचे नियोजना करण्यात आले आहे.

(२) नाही.

१७० खारभूमी योजनांपैकी ७९ खारभूमी योजनांची कामे पूर्ण झालेली असून १५ योजनारंची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरीत ७६ योजनांपैकी ५६ योजनांचे कार्यक्षेत्रात कांदळवन असल्याने सदर ठिकाणी योजना राबविणे शक्य नाही.

उर्वरीत २० खारभूमी योजना खारभूमीच्या प्रचलित मापदंडात बसत नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साळवा ते निमाणे (ता.धरणगांव, जि.जळगांव) रस्त्यांचे कामाबाबत**

**(४३) ९४१० (०७-०४-२०१५). श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साळवा (ता.धरणगांव, जि.जळगांव) येथे साळवा ते निमाणे रस्त्यांचे अंतरे अवघे एका किलोमिटरवर असून या रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम फक्त ६०० मिटर झालेले असून बाकी ८०० मिटर काम अजून अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निमाणे ते साळवा दरम्यान एका किलोमिटर अंतराचा रस्ता असून तेथून मिणे गावाचा हा दैनंदिन वापर दवाखान्यात, बँकेत तसेच शाळेत जाणाऱ्या विद्‌यार्थ्यांचा वापर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील शेतकऱ्यांची शेती निमाणे-पिपळे-बाभळे-शिवार असल्यामुळे या रस्त्यावरुन मोठ्या प्रमाणात वापर असून उर्वरित डांबरीकरणाचे काम केव्हा करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) साळवा ते निशाणे रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र.१४ असून सदर रस्त्याची लांबी १.६०० कि.मी. आहे. त्यापैकी १.२०० कि.मी. लांबी डांबरी पृष्टभागाची आहे. उर्वरीत ४०० मीटर लांबीपैकी ३२५ मीटर लांबीमधील डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे. उर्वरीत ७५ मीटर लांबीतील डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त होणा-या निधी व निकषाच्या अधिनतेने व प्राधान्य क्रमाने हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**जळगांव जिल्ह्यासह महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीमधून ऑनलाईन दाखले देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या महासंग्राम कक्षाबाबत**

**(४४) ९४११ (०७-०४-२०१५). श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यासह महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीमधून ऑनलाईन दाखले देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या महासंग्राम कक्षासाठी खर्च करण्यात येणाऱ्या निधीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे माहे जानेवारी, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संग्रामकक्षामध्ये ऑपरेटर नसतांनाही त्यांच्या दरवर्षीच्या पगारावर ५ कोटी ५३ लाख व स्टेशनवर ६ कोटी ६३ लाख खर्च होतात, हे ही खरे आहे काय,

(३) ग्रामपचायतीमध्ये ७/१२ जन्म-मृत्यु, दाखल्यासह विविध दाखले देण्यासाठी संग्राम कक्ष सुरू करण्यात आले आहे त्यासाठी ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आली आहे, व याकरिता १३ व्या वित्त आयोग निधीतून दरमहा ८ हजार ८०० रूपये कपात केले जातात हे ही खरे आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नॅशनल ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत ई-पंचायत/संग्राम या मिशन मोड प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. देशातील सर्व पंचायती राज सस्थांच्या कारभारात एकसुत्रता व पारदर्शकता आणून नागरिकांना विविध सेवा/दाखले त्यांचे रहिवासी क्षेत्रातच उपलब्ध करुन देण्यासाठी ई-पंचायत/संग्राम प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत विविध आज्ञावलीत माहिती भरण्यासाठी तांत्रीक मनुष्यबळ तसेच विविध आज्ञवली/संकेतस्थळे विकसित करणे, त्यांचे प्रशिक्षण बैठका व ग्रामपंचायत स्तरावरील कागद, टोनर इ. सर्व खर्चाच्या बाबींसाठी ग्रामपंचायत स्तरावर महाऑनलाईनला रु.८००० + सेवा कर आदा करण्यात येतो.

---

**स्व. यशवंतराव चव्हाण व स्व. डॉ. पंजाबराव देशमुख यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यासाठी शिफारस करणेबाबत**

**(४५) ९४१६ (०६-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्व. यशवंतराव चव्हाण व स्व. डॉ. पंजाबराव देशमुख यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यासाठी शिफारस करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले आहे , हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने केंद्र शासनाकडे शिफारस करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१५) :** (१) होय,

(२) व (३) भारतरत्न पुरस्कारा संदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये “The recommendation for Bharat Ratna are made by the Prime Minister himself to the President. No formal recommendations for this are necessary.” तथापि, राज्य विधानमंडळात वेळोवेळी मांडण्यात आलेले ठराव, झालेल्या चर्चा व त्या अनुषंगाने तत्कालिन मा.मुख्यमंत्री/मा.मंत्री यांनी दिलेल्या आश्वासनांच्या अनुषंगाने काही प्रकरणांमध्ये भारतरत्न पुरस्कारासंदर्भात शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार स्व. यशवंतराव चव्हाण यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार मिळण्याबाबत सन २०१२ मध्ये केंद्र शासनास शिफारस करण्यात आली आहे. तथापि, स्व.डॉ.पंजाबराव देशमुख यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याबाबत, शिफारस करण्यात आलेली नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीत रस्ते, पाणी व वीज या मुलभुत सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(४६) ९४९५ (१०-०४-२०१५). श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल औद्योगिक वसाहतीमध्ये ६५ लघु उद्योग असून २५० अधिक कामगारांचा उदरनिर्वाह या वसाहती मुळे चालत असून वसाहती मधील रस्त्याच्या दुरावस्था, पाण्याचा अपुरा पुरवठा, वांरवार खंडीत होणारा विज पुरवठा इत्यादी मुलभूत सुविधा न मिळाल्याचे कारणास्तव उत्पादनावर परिणाम होत असून सिडको अथवा पनवेल महानगरपालिकाही दुर्लक्ष करत असल्यामुळे औद्योगिक वसाहतीची दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केला आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०५-२०१५) :** (१) पनवेल औद्योगिक वसाहतीमध्ये ६५ लघु उद्योग असून २५० अधिक कामगारांना रोजगार प्राप्त झालेला नसून वसाहतीमध्ये ८५ उद्योग असून १०२१ कामगारांना रोजगार प्राप्त झालेला आहे. तसेच सुक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना (MSECDP) अंतर्गत पनवेल सहकारी औद्योगिक वसाहतीचा एकात्मिक पायाभूत सुविधा विकास योजनांतर्गतचा प्रस्ताव सन २०१२ पासून सिडबी या वित्तीय संस्थेच्या स्तरावर प्रलंबित आहे. या शिवाय वसाहतीतील मुलभूत सुविधांचे दुरावस्थेबाबत कोणताही प्रस्ताव उद्योग संचालनालयास प्राप्त झालेला नाही.

(२), (३) व (४) याबाबतचे निवेदन औद्योगिक वसाहतीकडून प्राप्त झालेले नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारशिवनी / रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) आदिवासी गावे नॅशनल पार्क / बफर झोन च्या बॉर्डरवन असल्याने जंगलातील जनावरे या गावातील शेतक-यांच्या शेतात जाऊन पिंकांचे होत असलेले नुकसान**

**(४७) ९५१२ (०७-०४-२०१५). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारशिवनी / रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) आदिवासी गावे नॅशनल पार्क / बफर झोन च्या बॉर्डरवर असल्याने जंगलातील जनावरे या गावातील शेतक-यांच्या शेतात जाऊन पिकांचे नुकसान होत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता जंगलाला लागून असलेल्या शेतींना वन विभागाकडून तारेचे कुपण घालून देण्याची मागणी तेथील शेतक-यांनी संबंधित विभागाकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नुकसानग्रस्त शेतक-यांना शासनाकडून कोणत्या प्रकारची मदत दिली वा देण्यात येत आहे, तसेच तारेचे कुंपण घालण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) वन्यप्राण्यांपासून शेतपिकांचे नुकसान प्रकरणी शासनाच्या प्रचलीत निर्णयानुसार संबंधित नुकसानग्रस्त शेक-यांस नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

तारेचे कुपण घालून देण्याबाबत शेतक-यांनी मागणी केल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि सन २०११-१२ मध्ये पुर्व पेंच, पिपरीया या वनपरिक्षेत्रातील फुलझारी या गावातील जंगलाला लागुन असलेल्या शेतीचे वन्यप्राण्यापासून नुकसान होऊन नये यासाठी ४.५० कि.मी. सौर ऊर्जा कुंपण लावण्यात आले आहे. सन २०१४-१५ करिता रु.३५.०० लक्षचा प्रस्ताव जिल्हा योजना समिती. नागपूर यांचेकडे पठविण्यात आला असून अंबाझारी पठार, ता.पारशिवनी करिता रु.१०.३१लक्ष निधी प्राप्त झाला आहे.

---

**मनसर-खवारा हायवेचे विस्तारीकरण करण्याबाबत**

**(४८) ९५१७ (१०-०४-२०१५). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनसर-खवारा हायवेचे विस्तारीकरणांच्या (जि.नागपूर) अनेक अडचणी येत असून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने यासंदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा असे निर्देश माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्य शासनस्तरावरून आतापर्यंत कोणत्या स्वरूपाच्या पाठपुरावा करण्यात आला आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :** (१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.केंद्रीय मंत्री भुतल, परिवहन व महामार्ग मंत्रालय, मा.केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार), पर्यावरण, वन व पर्यावरण बदल यांनी सदर प्रश्नी लक्ष घालण्याच्या सूचना दिल्या आहेत.
(२) राज्य शासनाच्या पर्यावरण खात्याकडून हस्तांतरीत केलेल्या वन जमिनीच्या जागेवर काम करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. उपविभागीय अधिकारी, रामटेक व वनसंरक्षक, रामटेक यांनी कि.मी. ६७९/०० ते कि.मी. ६८९/०० या १० कि.मी. लांबीतील झाडे तोडण्याची परवानगी दिली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रामटेक (पारशिवनी) (जि.नागपूर) तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानातून शिधापत्रिकाधारकांना नियमित धान्याचा पुरवठा होत नसल्याबाबत

**(४९) ९५१९ (०७-०४-२०१५). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (पारशिवनी) (जि.नागपूर) तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानातून शिधापत्रिकां धारकांना वेळेवर व नियमित धान्याचा पुरवठा होत नाही तसेच दुकानेही वारंवार बंद ठेवण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात सर्व शिधावाटप दुकानांची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार संबंधित शिधावाटप दुकानांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.
श्री.सतिश दुनेदार, रामटेक यांनी श्री.निलकंठ महाजन, यांच्या स्वस्त धान्य दुकान क्र.१८४७० रामटेकच्या बाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दुकानाची तपासणी केली असता, तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.
(२) माहे डिसेंबर, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीत रामटेक तालुक्यातील रास्तभाव दुकानाच्या एकूण ७८ तपासण्या करण्यात आलेल्या असून दोषयुक्त प्रकरणे आढळून आलेले नाहीत.

माहे डिसेंबर, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीत पारशिवनी तालुक्यातील एकूण ३२ रास्तभाव दुकानाचे तपासण्या करण्यात आलेल्या असून चौकशीनुसार लाभार्थ्यांना धान्याचे वाटप नियमित करण्यात आल्याचे दिसून आले. त्याबाबत कोणतीही तक्रार किंवा निवेदन प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील कन्हान व पारशिवनी पोलीसांनी अवैध रेती वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर व स्कॉर्पिओ जप्त केल्याबाबत

**(५०) ९५३० (०६-०४-२०१५). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्हान व पारशिवनी (जि. नागपूर) पोलीसांनी जुनी कामठी आणि इटगाव शिवारात माहे डिसेंबर, २०१४ च्या दरम्यान केलेल्या कारवाईमध्ये अवैध रेती वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर व स्कॉर्पिओ जप्त केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी पारशिवनी परिसरात १ ब्रास रेती रु. ३,२००/- चोरुन नेताना २ आरोपी आढळले त्यामध्ये १ ट्रॅक्टर व १ स्कॉर्पिओ गाडी जप्त करण्यात आली असून या प्रकरणी २ आरोपींविरुध्द पोलीस स्टेशन पारशिवनी येथे गु.र.क्र.०१/१५, भा.दं.वि. कलम ३७९, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.

जुनी कामठी, कन्हान नदी रेती घाट परिसरात १ ब्रास रेती किंमत रु.२,०००/- चोरुन नेताना २ आरोपी आढळले १ ट्रॅक्टर व १ स्कॉर्पिओ गाडी जप्त करण्यात आली असून या प्रकरणी २ आरोपींविरुध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे गु.रक्र. ०२/१५ भा.दं.वि. कलम ३७९, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.